भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.०५/२०११
निशाण क्र. ६० लगत

**<u>अर्जदारांतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ सुधाकर बापुराव कुडमेथे यांचा उलटतपास शपथेवर, गैरअर्जदार क्र.०१ व ०२ तर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी विधीज्ञ श्री. डी. एम. निमकर यांचेकडून</u> –**

**२०.** बाजीराव हा माझा चुलत भाउ आहे. गट क्र.५६ या गटात आमची २७ एकर मिळकत होती. त्या मिळकतीला ७/१२ उता–यात सहा जणांची नांवे नमुद होती. सदर जमीन संपादीत झाली त्यावेळी सहा जणांची नावे नमुद होती. त्यावेळी भुसंपादनाचा मिळालेला मोबदला ७/१२ उता–यावर नमुद सर्व सहा जणांनी घेतला होता.

**२१.** प्रस्तुत प्रकरणात इतर अर्जदारांच्या वतीने साक्ष देण्याकामी मला इतर अर्जदारांनी कोणतेही अधिकारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला इतर अर्जदारांच्या वतीने साक्ष देण्याचा अधिकार नाही. आमची जमीन अंदाजे २५ वर्षापूर्वी संपादीत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी भुसंपादनाचा मोबदला सरकारने आम्हाला दिला होता. मोबदल्याची रक्कम कमी मिळाल्याबाबत आम्ही तक्रार केली होती. आम्हाला भुसंपादनाचा किती मोबदला मिळाला होता हे मला सांगता येणार नाही.

**२२.** हे म्हणणे खरे नाही की, आमची संपादीत मिळकत कोरडवाहू होती. हे म्हणणे खरे आहे की, जमीन ओलीताखाली असल्यावर त्याबाबतची नोंद ७/१२ उता–यावर असते. हे म्हणणे खरे आहे की, आमची जमीन ओलीताखाली होती याबाबतची

नोंद आम्ही सादर केलेल्या ७/१२ उता–यांत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची जमीन कोरडवाहूच होती त्यामुळे ओलीताबाबतची नोंद ७/१२ उता–यांत नाही.

**२३.** आम्हाला रक्कम मिळाल्यावर आम्ही ४२ दिवसांनी केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, कान्हाळगांव, वाई व दुर्गाळा हे तिन वेगवेगळे गावे आहेत. या तिन पैकी कान्हाळगांव व दुर्गाळा या गावांसाठी एकच ग्रामपंचायत असून वाई या गावासाठी वेगळी ग्रामपंचायत आहे.

**२४.** हे म्हणणे खरे आहे की, १९९० ते १९९५ च्या कालावधीत जमीनीचे दर फार कमी होते. हे म्हणणे खरे आहे की, आमची जमीन संपादीत करतेवेळी शासनाचे अधिकारी आमच्या जमीनीच्या ठिकाणी आले होते व त्यांनी पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी आमच्या जमीनीमध्ये झाडे, विहीर, बांधकाम इत्यादी असे काय आहे याबाबत पाहणी करुन पंचनामा केला होता, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेच्या जमीन दरानुसारच आम्हाला भुसंपादनाचा मोबदला देण्यात आला होता.

**२५.** हे म्हणणे खरे आहे की, आमच्या जमीनीत आडजात, सागवान व मोहाची झाडे असल्याबाबत ७/१२ उता–यांत नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्याबाबतचा मोबदला शासनाने आम्हाला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे झाडांबाबत मोबदला मिळण्याची आमची मागणी बेकायदेशीर आहे.

**२६.** आमच्या जमीनीतुन आम्ही कापूस, ज्वारी, तुर अशी पीक घेत होतो हे दर्शविण्यासाठी तो माल विक्रीबाबतच्या कोणत्याही पावत्या आम्ही या प्रकरणात सादर

केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सांगत आहोत त्या प्रमाणे तितके उत्पन्न आम्हाला मिळत नव्हते.

**२७.** कान्हाळगांव हे मुख्य रस्त्यापासून ०५ किलोमिटर अंतरावर आहे. आमच्या गावापासून आमची शेती अंदाजे अर्धा किलोमिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कान्हाळगांव हे साधारण १०० लोकांची वस्ती असणारे गांव आहे. हे म्हणणे खरे आहे की, कान्हाळगांव साठीची बाजारपेठ मौजा वणी, करंजी व मारेगांव येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजारहाट करण्यासाठी वणी, करंजी व मारेगांव या गावांमध्ये जावे लागते, आमच्या गावात काही मिळत नाही. आमच्या गावात इयत्ता चौथी पर्यंत शाळा असेल. हे म्हणणे खरे नाही की, आमचे गांव छोटेसे असल्यामुळे व रस्त्यापासून दुर असल्यामुळे त्याचप्रमाणे तेथे बाजारपेठ नसल्याने गावातील जमीनीचे दर अल्पशे होते.

**२८.** मी अंबादास मेश्राम, रामदास मेश्राम व पोर्णीमा नैताम यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची जमीन आमच्या जमीनीपेक्षा सरस होती. हे म्हणणे खरे आहे की, अंबादास मेश्राम व रामदास मेश्राम यांची जमीन वाई गावाच्या शिवारात आहे. हे म्हणणे खरे आहे की, कान्हाळगांव येथील भुसंपादनाबाबतच्या कोणत्याही निकालाची प्रत मी या प्रकरणात सादर केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कान्हाळगांव येथील जमीनीला कमी दर मिळाल्यामुळे मी त्याबाबतचे न्यायनिर्णय सादर केले नाही.

**२९.** हे म्हणणे खरे नाही की, आमच्या शेतापासून महामार्ग अतिशय दुर आहे. हे

भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.०५/२०११
निशाण क्र. ६० लगत

म्हणणे खरे आहे की, आजही कान्हाळगांव येथील जमीनीला तितकीशी मागणी नाही. हे म्हणणे खरे नाही की, तत्कालीन दरानुसार शासनाने आम्हाला योग्य मोबदला दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीचा जास्तीचा मोबदला लाटण्यासाठी आम्ही खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2026.07.09 17:20:59 +0530

**(ब. द. तारे)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
केळापूर.

दि.०९/०७/२०२६

भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.०५/२०११
निशाण क्र. ६० लगत

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | J. G. Thakre |
| Court name | : | Civil Judge, S. D. Kelapur |
| Date of evidence | : | 09/07/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 09/07/2026 |
| Evidence uploaded on | : | 09/07/2026 |